**एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८. राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान योजनेसाठी मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शुध्दीपत्रक क्रमांकः धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५ (ई.ऑ.क्र. ७८४०८६)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२६.

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६.२०२३.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.१२.१२.२०२३.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण-२०२३/प्र.क्र.८१-अ/टेक्स-५, दि.०६.०३.२०२४.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.२८.०८.२०२४.
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक मधौऔ २०१९/प्र.क्र.६/उद्योग-२, दि.०७.०३.२०१९.
६) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, क्रमांक मधौऔ २०२३/प्र.क्र.१८७/उद्योग-२, दि.३१.१२.२०२५.

<u>प्रस्तावना :-</u>

दि.०२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणान्वये राज्यातील विविध वस्त्रोद्योग घटकांना भांडवली अनुदान देण्याच्या योजना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. दि.२८ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान योजनेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परि. क्र.३ येथील अ.क्र.१२ मध्ये व परि.६ येथील अ.क्र.vii मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शुध्दीपत्रक:-</u>**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार वाचा येथील दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील परि. क्र.३ येथील अ.क्र.१२ येथे नमूद केलेले "भांडवली अनुदानाची एकूण रक्कम स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या (FCI) १००% पेक्षा जास्त असणार नाही. यामध्ये केंद्र शासन किंवा राज्याच्या इतर विभागांनी दिलेल्या प्रोत्साहनांचा समावेश राहील" **<u>या वाक्याऐवजी</u>** "वस्त्रोद्योग धोरणांतर्गत मिळणारे वीज अनुदान वगळून अनुदानाची एकूण रक्कम उद्योग विभागाने निश्चित केलेल्या स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या (FCI) १००% पेक्षा जास्त असणार नाही. यामध्ये केंद्र शासन किंवा राज्याच्या इतर विभागांनी दिलेल्या प्रोत्साहनांचा समावेश राहील" असे वाचण्यात यावे.

२. तसेच स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या (FCI) १००% मर्यादेचे पालन सुलभरित्या व्हावे तसेच माहितीचे आदान प्रदान होण्याच्या दृष्टीने दि.२८.०८.२०२४ च्या मार्गदर्शक सुचनेबाबतच्या शासन निर्णयातील परि.६ येथील अ.क्र.vii मध्ये भांडवली अनुदान मंजूर करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये उद्योग विभागाचे प्रतिनिधी (विकास आयुक्त, उद्योग संचालनालय) यांचा समावेश करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०७१७४२४०८४३६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKRISHNA
BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.08.07 17:43:51 +05'30'

**(श्रीकृष्ण पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. आमदार (सर्व) महाराष्ट्र राज्य.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१४. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१६. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१७. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
१८. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
१९. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
२०. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई.
२१. वस्त्रोद्योग विभागातील सर्व कार्यासने.
२२. निवड नस्ती (कार्यासन टेक्स-५).